# IWMP-Cluster no. 12, TE-14, 2010-2011

## राष्ट्रविकास ॲग्रो एज्युकेशन संस्था, अमळनेर,

## शाखा- जामनेर, जि. जळगांव

## शिर्षक :- बचतीतुन व्यवसायाकडे

## गावः - केकतनिंभोरा, ता. जामनेर



एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत केकतनिंभोरा येथे गिता महिला बचत गट, मे-2013 मध्ये स्थापन करण्यात आला. या गटात एकुण 20 महिला सभासदांची निवड झाली. व गटाची बचत देखील मासिक 100/- रु. प्रमाणे ठेवण्यात आली.



ऑक्टोंबर 2013 ला गटाची बैठक घेवून आर्थिक व्यवहार करणेबाबत चर्चा करीत असता. संस्थेच्या कार्यकर्त्या सुनंदा विसावे यांनी अशी मांडणी केली की, आपले गाव हे ब-यापैकी मोठे असुन येथे रेडीमेड कापड दुकान नाही. तरी आपण छोटेसे कापड दुकान जर सुरु केले तर एक लघुउद्योग सुरु होवू शकतो. ही गोष्ट गटातील सभासद सरीता प्रफुल्ल पंडीत यांना फारच आवडली व त्यांना उदयोगासाठी एकप्रकारे नवी दिशा मिळाली व त्या लगेच कापड दुकान टाकण्यासाठी तयार झाल्या.

मग सरीता ताईंनी गटातुन 10,000/- रुपये घेतले आणि गावात कोणत्या कपडयांची जास्त विक्री होईल हा विचार करुन रेडीमेड कपडे, ब्लाऊस पिस, व साडया अशा प्रकारे छोटासा व्यवसाय त्यांनी सुरु केला. हळूहळू या कामासाठी सरीता ताईंचे पती प्रफुल्ल पंडीत हे देखील त्यांना या कामात/व्यवसायात मदत करु लागले. जसे ते रेडीमेड कपडे घेवून आठवडे बाजारात जावू लागले. व त्यासाठी लागणारा माल ही ते त्यांना उपलब्ध करुन देवू लागले. तसेच जवळपासच्या गावातही उदा. गुरुवारी - वरखेडी, रविवारी -पहुर येथे, तसेच मंगळवारी - नेरी येथे बाजारातही ते कपडयांचा व्यवसाय करु लागले. त्यामुळे ब-यापैकी नफा या व्यवसायात होवू लागला. आणि सरीता ताई सांगता की, मी अशा पध्दतीने हा व्यवसाय घरच्या घरी करीत असल्यामुळे मी मुलांकडे व घराकडे व्यवस्थित लक्ष देवू शकते. व मला घरी बसता मी चार पैसेही कमवू शकते. तसेच या व्यवसायात मला अजुन काही मदत मिळाली. तर मी हा व्यवसाय अजुन वाढवू शकते.

अशाप्रकारे बचतीतुन ताई व्यवसायाकडे गेल्या.

**सुनंदा पी. विसावे**

**(उपजिवीका तज्ञ)**

**राष्ट्रविकास ॲग्रो एज्युकेशन संस्था, अमळनेर**

**शाखा-जामनेर, जि. जळगाव**